महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपूरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद– ४३१ ००५
दुरध्वनीक्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल:roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/आस्था-३/बदली/२०२३/ 2317 दिनांक : 29 MAY 2023

**कार्यालयीन आदेशः**

संदर्भ:-
१. उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. जीईसी/३३९७/७३७६/तांशि-१, दि. १०/०४/१९९७.
२. महाराष्ट्र शासकीय कर्मचायांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाया विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र. संकिर्ण-२०१५/(०१/१५) मशि-१, दि. २५/०५/२०१५.
४. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि. ०९/०४/२०१८.
५. सामान्य प्रशासन विभाग शा. नि. क्र. एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.२० कार्यासन-१२, दि. २९/०७/२०२१.
६. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. तंशिस/१२/आस्था/बदल्या/२०२३/१११, दि. १४/०२/२०२३.
७. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/मशि-१, दि. २५/०४/२०२३.
८. नागरी सेवा मंडळाची बैठक दि. २४/०५/२०२३.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील (सन २००६ महा. २१) च्या कलम ७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, दिनांक २८/०५/२०१५ च्या अधिसुचनेद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट-क साठी बदली करणारे सक्षम प्राधिकरण म्हणून विभागीय सहसंचालकांना पद निर्देशित करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन वरील संदर्भ क्र. ७ च्या शासन निर्णयान्वये गठीत नागरी सेवा मंडळ यांच्या शिफारशीनंतर सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील (तांत्रिक) खालील कर्मचाऱ्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी विनंती/प्रशासकीय कारणास्तव विभागांतर्गत बदली करण्यात येत असून स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदलीनंतर पदस्थापनेचे ठिकाण | बदलीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | **निदेशक (सर्वसाधारण यांत्रिकी)** | | |
| १. | प्रदिप भास्करराव शेवलीकर, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर श्री माघाडे यांच्या रिक्त होणाऱ्या पदावर | विनंती बदली |
| २. | गुलाब मैनाजी माघाडे, शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड श्री शेवलीकर यांच्या रिक्त होणाऱ्या पदावर | विनंती बदली |

सदर बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामूळे बदली झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे कार्यमुक्ततेच्या दिनांकापर्यंतचे अथवा जास्तीत जास्त दि. ३०/०६/२०२३ पर्यंतचे वेतन ते सध्या कार्यरत असलेल्या संस्थेच्या आस्थापनेवर काढावे. त्यानंतरचे वेतन कोणत्याही परिस्थितीत बदली पुर्वीच्या संस्थेकडून/आस्थापनेकडून काढण्यात येऊ नये. सदर वेतन संबंधित कर्मचारी बदलीच्या संस्थेत रुजू झाल्यानंतर बदलीनंतरच्या संस्थेने/आस्थापनेने काढावे. दि. ०१/०७/२०२३ पासूनचे वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या संस्थेतील/आस्थापनेतील आहरण व संवितरण अधिकाऱ्याने अदा केल्यास त्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

संदर्भ क्र. ५ मधील अ. क्र. १० नूसार महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८२ मधील नियमानूसार दिलेल्या पदग्रहण अवधीतच, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांचे बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी, अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजून झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

उपरोक्त कर्मचाऱ्यांनी बदली करण्यात आलेल्या संस्थेत / कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचाऱ्यांची बदली त्यांच्या विनंती वरुन करण्यात आलेली आहे किंवा ज्यांचे मुख्यालयात बदल होत नाहीत अशा कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ज्या कर्मचाऱ्यांची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेली आहे. त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियमानुसार प्रवासखर्च, संयुक्त बदली अनुदान व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः-
१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नांदेड यांना मानार्थ सादर.
३. मा. उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, जिंतूर यांना मानार्थ सादर.
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर/ शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड
५. संबंधित संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्याकडील असलेला कार्यभार हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही संबंधितांना कार्यमुक्त करणेपुर्वी पुर्ण करुन नंतरच कार्यमुक्त करण्यात यावे व बदली झालेल्या संस्थेत कर्मचाऱ्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात यावे.
६. संबंधित कर्मचारी (संस्था/कार्यालय प्रमुखामार्फत)
७. गोपनिय कक्ष
८. निवड नस्ती